# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

दिनांक :- 3/12/2020

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ 416 /२०२०-२१

संगणक विभाग
आवक क्र. 1007
दिनांक : 3/12/20

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

उप. आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा /416 /२०२०-२१ दिनांक :- 01/12/2020

### // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या (नग) |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (पु.) जेसल पार्क येथे जुन्या जलकुंभाच्या जागेवर बांधकाम विभागामार्फत वाचनालय व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बांधण्याच्या बांधकामामध्ये बाधित होत असल्याने सदर ठिकाणी 03 नग झाडे काढणे आवश्यक आहे.<br>(मा. कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे जा.क्र मनपा/ सा.बां./ 7838/ 2020-21 दि.05/11/2020 रोजीचे पत्र.) | 01 नग पिंपळ<br>01 नग अशोक<br>01 नग बदाम |
| 2. | भाईंदर (प.) डोंगरी, पंपींग स्टेशनच्या मागील टेकडी वरती सदरची झाडे पंपींग स्टेशनच्या बाजूने झुकलेली असल्याने जोराच्या वाऱ्याने पडून जलवाहिनीचे व पंपींग स्टेशनचे नुकसान होऊन पाणी पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे.<br>(मा. कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांचे जा.क्र मनपा/ पा.पु./ 1605/ 2019-20 दि.04/01/2020 रोजीचे स्मरणपत्र.) | 02 नग गुलमोहर<br>01 नग निलगीरी |
| 3. | भाईंदर (प.) डोंगरी पंपींग स्टेशनच्या बाजूला असलेल्या महानगरपालिकेच्या जिमच्या मागील टेकडीवरती असून जिमच्या दिशेने धोकादायकरीत्या झुकलेली आहेत. त्यामूळे जोराच्या वाऱ्याने झाडे पडून जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे. (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग) | 02 नग गुलमोहर |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका